मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
MUMBAI METROPOLITAN REGION
DEVELOPMENT AUTHORITY

# MUMBAI METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY

## Notice

No. SROT/Kalyan Growth Centre/TPS -1/2/ ४० /2019

UNDER SECTION 60(1) READ WITH SECTION 61(2) OF THE MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966

**WHEREAS,** the Govt. of Maharashtra by its Notification No. TPS 1299/1910/CR-34/2000/UD-12, dated 9th August, 2006, (published in Government Gazette, on 7th December, 2006) promulgated in exercise of its powers conferred by clause (c) under sub-section(1) of section 40 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred as 'the said Act') had appointed the Mumbai Metropolitan Region Development Authority (hereinafter referred to as 'MMRDA'), established under MMRDA Act, 1974, to be the 'Special Planning Authority' for the area of 27 villages of Kalyan & Ambarnath Talukas from Thane District;

**AND WHEREAS,** in accordance with sub-section (1) of section 31 of the said Act, the State Government has sanctioned the Development Plan of 27 villages of Kalyan & Ambarnath Talukas from Thane District vide Urban Development Department Notification No. TPS.1212/1697/C.R.No.101/13/UD-12, dated 11th March 2015 and thereafter sanctioned the excluded parts by Government Notification No. TPS.1216/C.R.No.-240/16/UD-12, dated 9th May, 2017 and by further Government Notifications No. TPS.1215/178/C.R.No.16/15/UD-12, dated 3rd June, 2017 and by subsequent Government corrigendum No. TPS.1216/C.R.No.240/16/UD-12, dated 13thJune, 2017;

**AND WHEREAS,** the Govt. of Maharashtra by its Notification No. TPS.1215/941/CR-42/15/UD-12, dated 30th April, 2016 has now retained the appointment of MMRDA as the Special Planning Authority for the 10 Villages (area approx. 1089 Hectare) namely Bhopar(pt.), Sandap, Usarghar(pt.), Gharivali(pt.), Mangaon(pt.), Hedutane(pt.), Kole, Katai(pt.), Nilaje(pt.) &Ghesar(pt.) out of earlier notified area of 27 Villages from Kalyan & Ambarnath Talukas to develop Growth Center and has cancelled the appointment of MMRDA as the Special Planning Authority for the rest of the 27 Villages from Kalyan & Ambarnath Talukas from Thane District (herein after referred to as Proposed Growth Centre in Kalyan Taluka);

**AND WHEREAS,** MMRDA in its 142nd Meeting held on 29th March, 2017 has by Resolution No. 1406 given its approval to undertake the development of said Growth Centre in Kalyan Taluka (excluding the area of sanctioned or committed Special Township Project (STP) within the Growth Centre area) by undertaking one or more Town Planning Schemes and authorised the Metropolitan Commissioner, MMRDA to declare the intention as per Section 60 of the said Act as well as any further necessary action till the preparation of Draft Town Planning Scheme/s;

वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१. कार्यालय : २६५९ १२३४ • इपीएबीएक्स : २६५९ ०००१ / ४०००
फॅक्स : २६५९ १११२ / २६५९ १२६४ • वेब साईट : https://mmrda.maharashtra.gov.in

**AND WHEREAS,** MMRDA by its Notice dated 21st June, 2017 had declared its intention to prepare the Town Planning Scheme No. 1 in the part area of 5 Villages of Katai, Nilaje, Kole, Hedutane and Ghesar for approx. 314 Ha. out of the entire area of the Proposed Growth Centre in Kalyan Taluka under Section 60(1) of the said Act;

**AND WHEREAS,** in order to have an integrated planning of entire Proposed Growth Centre in Kalyan Taluka and for the sake of convenience of relocation of DP proposals within the boundary of the said Growth Centre, the Metropolitan Commissioner has approved to prepare a single Town Planning Scheme for the said Growth Centre and accordingly,MMRDA by its Notice dated 14th November, 2017 had declared its intention under sub-section (1) of section 60 read with section 62 for the additional area to be included in the Town Planning Scheme No. 1 (excluding the part of Khoni, Antarli, Hedutane, Kole Integrated Township Project and land locked parcels bounded by ITP located within the Proposed Growth Centre in Kalyan Taluka) as its integral part.

**AND WHEREAS,** both the declarations of intention to prepare Town Planning Scheme No. 1 have lapsed and any such lapse in declaration does not debar Planning Authority from making any fresh declaration any time in respect of the same area as per sub-section (2) of section 61.

**NOW THEREFORE,** MMRDA declares its intention under sub-section (1) of section 60 of the said Act for the Town Planning Scheme for Proposed Growth Centre in Kalyan Taluka (excluding the area under proposed Multi-modal Corridor alignment along with its interchanges falling within growth centre, the part of Khoni, Antarli, Hedutane, Kole ITP and land locked parcels bounded by ITP located within the Proposed Growth Centre in Kalyan Taluka) The description of the said area is as specified in the Schedule given herein under:

**Schedule**

| **Sr. No.** | **Name of T.P.S.** | **Villages included in T.P.S.** | **Boundaries of area included in the T.P.S.** |
|---|---|---|---|
| 1 | **T.P.S. for Proposed Growth Centre in Kalyan Taluka** | Villages Bhopar(pt.), Sandap, Usarghar(pt.), Gharivali(pt.), Mangaon(pt.), Hedutane(pt.), Kole (pt.), Katai(pt.), Nilaje(pt.) &Nilajepada (pt.), Ghesar (pt.) | Area bounded by to the<br>**North:** -Starting from western boundary of Growth Centre along the southern side of Dedicated Freight Corridor alignment (D.F.C.) passing through Village Bhopar and further up to the eastern boundary of Growth Centre.<br>**East:-** Starting from southern side of D.F.C alignment. passing through Village Bhopar along the eastern boundary of Growth Centre and further up to southern boundary of Growth Centre.<br>**South:-** Southern Boundary of Growth Centre [excluding the part of Khoni, Antarli, Hedutane, Kole Integrated Township Project (ITP) and land locked parcels bounded by area of ITP].<br>**West :-** Starting from southern boundary of Growth Centre along the western Boundary of Growth Centre and further up to the southern side of D.F.C alignment passing through Village Bhopar. |

**The area included in the Town Planning Scheme bounded as described above is exclusive of the area under MMC alignment and its interchanges within Growth Centre.*

**THE PLAN** showing boundaries in Black verge of Town Planning Scheme for Proposed Growth Centre area in Kalyan Taluka is kept open for inspection of the public on all working days at the offices of the following: -

(1) The Collector, Thane.
(2) The Municipal Commissioner, Kalyan Dombivali Municipal Corporation, Kalyan (West).
(3) The Chief, Planning Division, 6th Floor, New MMRDA Building, Bandra-Kurla Complex, Bandra (East), Mumbai – 400 051.
(4) The Senior Planner, Sub Regional Office Thane, M.M.R.D.A,Multipurpose Hall, 2nd Floor, Near Oswal Park, Pokharan Road No. 2, Majiwada, Thane (W)- 400 601
(5) The Tehsildar, Kalyan Tehsil.

This Notice and Plan are also available on the web site of MMRDA at www.mmrda.maharashtra.gov.in.

R. A. Rajeev
Metropolitan Commissioner,
MMRDA

Mumbai,
dated: 15 JAN 2019

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

**सूचना**

क्र.एसआरओटी/कल्याण ग्रोथ सेंटर/टिपीएस-१/२/20 /२०१९

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ६१(२) सह कलम ६०(१) अन्वये

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र शासनाने आपली अधिसूचना क्रमांक टिपीएस.१२१९/१९१०/सीआर-३४/२०००/युडी-१२, दिनांक ९ ऑगस्ट, २००६ (दिनांक ७ डिसेंबर, २००६ रोजी शासन राजपत्रात प्रसिध्द झालेली) अन्वये नेमलेल्या आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे) च्या कलम ४०, पोट-कलम (१) च्या खंड (ग) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून प्रख्यापित केलेल्या आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ अन्वये स्थापन झालेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची (यापुढे ज्याचा उल्लेख "मुं.म.प्र.वि.प्रा." असा करण्यात आला आहे) ठाणे जिल्ह्यातील कल्याण व अंबरनाथ तालुक्यातील २७ गावांच्या क्षेत्रासाठी 'विशेष नियोजन प्राधिकरण' म्हणून नेमणूक केली होती;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अधिनियमाच्या कलम ३१ च्या पोट-कलम(१) अन्वये राज्य शासनाने नगर विकास विभागाच्या अधिसूचना क्र. टिपीएस.१२१२/१६९७/सी.आर.क्र.१०१/१३/युडी-१२, दिनांक ११ मार्च, २०१५अन्वये ठाणे जिल्ह्यातील कल्याण व अंबरनाथ तालुक्यातील २७ गावांच्या क्षेत्राच्या विकास योजनेस मंजुरी दिली आणि त्यानंतर वगळलेल्या भागास शासन अधिसूचना क्र. टिपीएस.१२१६/सी.आर.क्र.-२४०/१६/युडी-१२, दिनांक ९ मे, २०१७ अन्वये व त्यानंतर शासन अधिसूचना क्र. टिपीएस.१२१५/१७८/सी.आर.क्र.-१६/१५/युडी-१२, दिनांक ३ जून, २०१७ अन्वये आणि त्यापुढील शासन शुध्दीपत्रक क्र.टिपीएस.१२१६/सी.आर.क्र.-२४०/१६/युडी-१२, दिनांक १३ जून, २०१७ अन्वये मंजुरी दिलीआहे;

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र शासनाने आपली अधिसूचना क्रमांक टिपीएस.१२१५/९४१/सीआर-४२/१५/युडी-१२, दिनांक ३० एप्रिल, २०१६ अन्वये कल्याण व अंबरनाथ तालुक्यातील २७ गावांच्या या आधीच्या अधिसुचित क्षेत्रामधून १० गावांसाठी (क्षेत्र सुमारे १०८९ हे.आर.) अनुक्रमे भोपर(भाग), संदप, उसरघर(भाग), घारिवली(भाग), माणगाव(भाग), हेदुटणे(भाग), कोळे, काटई(भाग), निळजे(भाग) आणि घेसर(भाग) ग्रोथ सेंटरचा विकास करण्याकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची 'विशेष नियोजन प्राधिकरण' म्हणून नेमणूक आता कायम ठेवली आहे आणि कल्याण व अंबरनाथ तालुक्यातील २७ गावांच्या उर्वरित क्षेत्राकरीता प्राधिकरणाची नेमणूक रद्द केली आहे (यापुढे ज्याचा उल्लेख 'कल्याण तालुक्यातील प्रस्तावित ग्रोथ सेंटर'असा करण्यात आला आहे);

**आणि ज्याअर्थी,** मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाच्या दि. २९ मार्च, २०१७ रोजी झालेल्या १४२ व्या बैठकीतील पारित केलेल्या ठराव क्र. १४०६ अन्वये सुमारे १०८९ हे.आर. क्षेत्रामध्ये 'कल्याण तालुक्यातील प्रस्तावित ग्रोथ सेंटर' विकसित करण्याकरीता [त्यातील मंजूर किंवा बांधिल विशेष नगर वसाहत प्रकल्पाचे क्षेत्र वजा करता] एक वा अनेक नगर रचना परियोजना हाती घेण्याच्या प्रस्तावाला मान्यता दिली आहे आणि उक्त अधिनियमाच्या कलम ६० अन्वये उद्देश घोषित करण्यासाठी व नगररचना परियोजना प्रसिध्द होईपर्यंत करावी लागणारी सर्व कार्यवाही करण्यासाठी महानगर आयुक्त, मुं.म.प्र.वि.प्रा. यांना प्राधिकृत करण्यात आले आहे;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अधिनियमातील कलम ६०(१) अन्वये, मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाने कल्याण ग्रोथ सेंटरच्या संपूर्ण क्षेत्रापैकी स्थित असलेल्या काटई, निळजे, कोळे, हेदुटणे आणि घेसर या ५ गावांच्या क्षेत्रामधील सुमारे ३१४ हे.आर. क्षेत्रासाठी दि. २१ जून, २०१७ रोजी नगररचना परियोजना क्र. १ बनविण्याकरीता उद्देश घोषित केला होता;

**आणि ज्याअर्थी,** संपूर्ण ग्रोथ सेंटरचे एकात्मिक नियोजन करण्यासाठी आणि डि.पी. प्रस्तावांना सदर ग्रोथ सेंटरच्या हद्दीमध्ये पुनर्स्थापित करण्याच्या सोईच्या दृष्टीने, महानगर आयुक्तांनी संपूर्ण ग्रोथ सेंटरला एकाच नगररचना परियोजनेमध्ये अंतर्भूत करण्यास मान्यता दिली आहे; आणि त्यानुसार उक्त अधिनियमातील कलम ६२ सह कलम ६०(१) अन्वये मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाने ग्रोथ सेंटरचे उर्वरित क्षेत्र टिपीएस क्र. १ मध्ये (कल्याण तालुक्यातील प्रस्तावित ग्रोथ सेंटरमध्ये स्थित असलेल्या खोणी, अंतर्ली, हेदुटणे, कोळे एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पाचे क्षेत्र आणि या नगरवसाहत प्रकल्पामुळे बंदिस्त झालेल्या जागा वगळून) समाविष्ट करण्यासाठीचा उद्देश दि. १४ नोव्हेंबर, २०१७ रोजीच्या सूचनेन्वये घोषित केला होता;

**आणि ज्याअर्थी,** नगररचना परियोजना क्र. १ बनविण्याकरीता घोषित केलेले दोन्ही उद्देश व्यपगत झाले व असे उद्देश कुठल्याही प्रकारे व्यपगत झाल्यामुळे नियोजन प्राधिकरणास त्याच क्षेत्राच्या संदर्भात कोणत्याही वेळी नवीन उद्देश घोषित करण्यास उक्त अधिनियमातील कलम ६१ च्या पोट-कलम (२) नुसार प्रतिरोध असणार नाही.

**म्हणून, त्याअर्थी,** उक्त अधिनियमातील कलम ६० च्या पोट-कलम(१) अन्वये, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण कल्याण तालुक्यातील प्रस्तावित ग्रोथ सेंटर [सदर ग्रोथ सेंटरमधील प्रस्तावित मल्टी मोडल कॉरिडॉर व त्यासोबतच्या इंटरचेंजेसच्या (interchanges) आखणी खालील क्षेत्र, तसेच खोणी, अंतर्ली, हेदुटणे, कोळे या एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पाचे क्षेत्र (ITP) आणि या नगर वसाहत प्रकल्पामुळे बंदिस्त झालेल्या जागा वगळून] करीता नगर रचना परियोजना बनविण्याकरीता उद्देश घोषित करीत आहे. सदर क्षेत्राचे वर्णन पुढील परिशिष्ट मध्ये नमूद केल्याप्रमाणे आहे:

**परिशिष्ट**

| क्र. | नगररचना परियोजनेचे नाव | नगररचना परियोजने मध्ये समाविष्ट असलेली गावे | नगररचना परियोजनेमध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्राची हद्द |
|---|---|---|---|
| १. | कल्याण तालुक्यातील प्रस्तावित ग्रोथ सेंटरकरीता नगररचना परियोजना | मौ. भोपर(भाग), संदप, उसरघर(भाग), घारिवली(भाग), माणगाव(भाग), हेदुटणे(भाग), कोळे(भाग), काटई(भाग), निळजे(भाग), निळजेपाडा(भाग) आणि घेसर(भाग). | क्षेत्रालगत बांधिल होत असणाऱ्या हद्दी.<br>**उत्तरेस** :- ग्रोथ सेंटरच्या पश्चिमेकडील हद्दीपासून सुरु होऊन मौ. भोपर गावातून जाणाऱ्या प्रस्तावित डेडीकेटेड फ्रेट कॉरिडॉर (डी.एफ.सी.) आखणीच्या दक्षिणेकडील हद्दीलगत आणि त्यापुढे ग्रोथ सेंटरच्या पूर्वेकडील हद्दीपर्यंत.<br>**पूर्वेस** :- मौ. भोपर गावातून जाणाऱ्या प्रस्तावित डी.एफ.सी. आखणीच्या दक्षिणेकडील हद्दीपासून सुरु होऊन ग्रोथ सेंटरच्या पूर्व हद्दीलगत आणि त्यापुढे ग्रोथ सेंटरच्या दक्षिणेकडील हद्दीपर्यंत.<br>**दक्षिणेस** :- ग्रोथ सेंटरची दक्षिण हद्द [खोणी, अंतर्ली, हेदुटणे, कोळे या एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पाच्या (ITP) क्षेत्राचा भाग आणि या नगरवसाहत प्रकल्पाच्या क्षेत्रामुळे बंदिस्त झालेल्या जागा वगळून]<br>**पश्चिमेस** :- ग्रोथ सेंटरच्या दक्षिणेकडील हद्दीपासून सुरु होऊन ग्रोथ सेंटरच्या पश्चिम हद्दीलगत आणि त्यापुढे मौ. भोपर गावातून जाणाऱ्या प्रस्तावित डी.एफ.सी. आखणीच्या दक्षिणेकडील हद्दी पर्यंत. |

** सदर नगर रचना परियोजनेमध्ये वरीलप्रमाणेच्या हद्दींमुळे बांधिल होत असणाऱ्या क्षेत्रामधून ग्रोथ सेंटरमधील प्रस्तावित मल्टी मोडल कॉरिडॉर व त्यासोबतच्या इंटरचेंजेसच्या (interchanges) आखणी खालील क्षेत्र वगळण्यात आले आहे.*

कल्याण तालुक्यातील प्रस्तावित ग्रोथ सेंटरकरीता नगररचना परियोजनेची काळ्या रंगाच्या रेषेत हद्द दर्शविणारा नकाशा हा खालील कार्यालयांमध्ये कार्यालयीन कामकाजाच्या सर्व दिवशी जनतेच्या निरीक्षणासाठी ठेवण्यात आला आहे:-


१. जिल्हाधिकारी, ठाणे.
२. महापालिका आयुक्त, कल्याण –डोंबिवली महानगरपालिका, कल्याण (प.).
३. प्रमुख, नियोजन विभाग, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, ६ वा मजला, नवीन प्राधिकरण इमारत, वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पू.), मुंबई.
४. वरिष्ठ नियोजक, उप प्रादेशिक कार्यालय, ठाणे, मुं.म.प्र.वि.प्रा. बहुउद्देशिय हॉल, २ रा मजला, ओसवाल पार्क जवळ, ठाणे (प.) – ४०० ६०१.
५. तहसिलदार, कल्याण तहसिल.

सदर सूचना व नकाशा हे मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाचे संकेतस्थळ www.mmrda.maharashtra.gov.in येथे उपलब्ध आहेत.

Rajeev

आर.ए. राजीव
महानगर आयुक्त,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण.

मुंबई,
दिनांक: 15 JAN २०१९ 2019




# PLAN SHOWING BOUNDARY OF TOWN PLANNING SCHEME AREA FOR PROPOSED GROWTH CENTRE IN KALYAN TALUKA

**Accompaniment to Declaration of Intention u/s 60(1) read with Section 61(2) of the M.R.& T.P. Act,1966**

कल्याण तालुक्यातील प्रस्तावित ग्रोथ सेंटरकरीता नगर रचना परियोजनेच्या क्षेत्राची हद्द दर्शविणारा नकाशा

म. प्रा .नि . व न.र. अधिनियम, १९६६च्या कलम ६१(२) सह कलम ६० (१) अन्वये घोषित केलेल्या उद्देशासोबतचा नकाशा

## LEGEND - सूची

### GENERAL - सर्वसाधारण


- VILLAGE BOUNDARY / गावाची हद्द
- GAOTHAN BOUNDARY / गावठाणाची हद्द
- SURVEY PLOT BOUNDARY / सर्वे नंबर / हद्द
- RIVER/NALLA / नदी / नाला
- WATER BODIES / PONDS / जलस्थाने / तलाव

### TRANSPORTATION - दळणवळण

- EXISTING RAILWAY LINE / अस्तित्वातील रेल्वे लाईन
- EXISTING ROADS / अस्तित्वातील रस्ते
- RAILWAY CORRIDOR / रेल्वे कॉरिडॉर
- PROPOSED MULTI MODAL CORRIDOR (M.M.C.) / प्रस्तावित मल्टी मोडल कॉरिडॉर (एम.एम.सी)

BOUNDARY OF PROPOSED GROWTH CENTRE IN KALYAN TALUKA FOR WHICH M.M.R.D.A IS THE SPECIAL PLANNING AUTHORITY (APPROX. AREA = 1,089 HECTARE)
मुं.म.प्र .वि .प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती असलेल्या कल्याण तालुक्यातील प्रस्तावित ग्रोथ सेंटरची हद्द (क्षेत्र अंदाजे = १,०८९ हे. आर)

BOUNDARY OF PROPOSED TOWN PLANNING SCHEME FOR GROWTH CENTRE IN KALYAN TALUKA
कल्याण तालुक्यातील ग्रोथ सेंटरकरीता प्रस्तावित नगर रचना परियोजनेची हद्द




**KEY MAP**
**LOCATION OF PROPOSED T.P.S. FOR GROWTH CENTRE IN KALYAN TALUKA**
कल्याण तालुक्यातील ग्रोथ सेंटरकरीता प्रस्तावित नगर रचना परियोजनेचे स्थान

| Sr. Planner, Sub regional Office, Thane<br>वरिष्ठ नियोजक,<br>उप प्रादेशिक कार्यालय , ठाणे | Chief, Planning Division<br>प्रमुख , नियोजन विभाग | Metropolitan Commissioner<br>महानगर आयुक्त |
|---|---|---|

Accompaniment to Notice No.
SROT/Kalyan Growth Centre/TPS -1/2/ 80 /2019 Dated 15 JAN 2019

Scale : (प्रमाण) 1: 10,000

N

एम एम आर डी ए
MMRDA